पाचोरा पोलीस ठाणे
ट तहसिल कार्यालयासमोर पाचोराता. पाचोरा जि. जळगाव.
पिनकोड क्र.४२४२०१संपर्कक्र. ०२५९६-२४०१३३
Email- pachorapi@gmail.com

दि १६/०६/२०२६

# प्रेस नोट

## दिवसा ढवळ्या पाचोरा येथे जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना पाचोरा पोलीसांनी केले जेरबंद पाचोरा पोलीसांची तात्काळ कारवाई करुन गुन्हा उघड

जळगांव जिल्ह्यामध्ये होणारे चोरीचे गुन्हे उघड करुन आरोपीतांचे शोध घेवुन कारवाई करणेबाबत मा.पोलीस अधिक्षक श्री. श्रीकांत धिवरे साहेब यांनी श्री राहुलकुमार पवार साहेब पोलीस निरीक्षक पाचोरा यांना सुचना दिल्या होत्या.

दिनांक १२/०६/२०२६ रोजी १५.१५ वाजेच्या सुमारास यातील आरोपी चेतन उर्फ जितु प्रभाकर भुतेकर व त्याचे सोबत दोन अनोळखी ईसमांनी फिर्यादी- सौ. कुसुम एकनाथ मोकळे वय- 42 वर्षे व्यवसाय- शेती रा.सातगांव डोंगरी ता.पाचोरा जि.जळगांव ह.मु. शक्तीधामच्या पाठीमागे लक्ष्मी आंगन कॉलनी पाचोरा या त्यांचे राहते घरी असतांना यातील आरोपीतांनी आपले अमेझॉनचे पार्सल आल्याचे खोटे सांगुन बळजबरीने घरात प्रवेश केला व त्यांच्यातील एकाने फिर्यादीस व त्यांचे दोन मुलीस व मुलास खाटेवर एका ठिकाणी बसविले, व तुमच्याकडे असलेल्या सोन्याच्या चिपा लवकर काढुन द्या नसता तुमचे काही खरे नाही असे म्हणुन बंदुकीचा धाक दाखविला, व घरातील कपाटातील कपडे अस्ताव्यस्त करुन कपाटात ठेवलेले सात हजार रुपये तसेच मुलाच्या गल्यातील सातशे रुपये घेवुन गेले,

यावरुन पाचोरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजी.न. 299/2026 कलम- 309(4) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक 13/06/2026 रोजी तात्काळ आरोपी चेतन उर्फ जितु प्रभाकर भुतेकर वय-21 वर्षे रा.सातगांव डोंगरी ता.पाचोरा जि.जळगांव याचा शोध घेवुन त्यास अटक केली, त्याचेकडुन तपासा दरम्यान त्याचा मामा- गोकुळ महादु वाघ (पाटील) वय- 37 वर्षे रा.सातगांव डोंगरी ता.पाचोरा जि.जळगांव हा निष्पन्न झालेला आहे. तसेच अनोळखी दोन पैकी एक आरोपी- योगेश परशराम शिंदे वय- ३१ वर्षे व्यवसाय- खा.नोकरी रा. प्लॉट न. ४९/५० दर्शन कॉप्लेक्स फ्लॅट न.१८ शिवाजीनगर सातपुर नाशिक याने गुन्ह्यातील चोरलेला मुद्देमाल 7,700/- रुपये व नकली खेळण्यातील पिस्टर काढुन दिलेली आहे. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले आहे की, आरोपी क्र. 02 गोकुळ महादु वाघ (पाटील) यास माहीती मिळाली होती की, फिर्यादीचे पाचोरा येथील घरामध्ये सोन्याच्या चिपा आहेत, त्यावरुन त्याने सोन्याच्या चिपा चोरी करण्याच्या उद्देशाने त्याचा मित्र नितीन पाटील रा.पाचोरा यास माहीती दिली व नितीन पाटील याने त्याचे परीचयाचे दोन ईसमांना बोलावुन घेतले व त्यांचे सोबत आरोपी क्र. 01 यास देवुन फिर्यादीचे घरी दिवसा जबरी चोरी केली आहे. आरोपी क्र. 02 व निष्पन्न आरोपी नितीन पाटील यांनी फिर्यादीचे घरी जबरी चोरी करण्यासाठी अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक अशोक नखाते, मा.उपविभआगीय पोलीस अधिकारी पाचोरा बापुसाहेब रोहोम यांचे मार्गदर्शनाखाली पाचोरा पोलीस स्टेशनचे प्रभारी मा.पोलीस निरीक्षक सो. राहुलकुमार पवार, पोउपनि कृष्णा घायाळ सफौ/ विलास पाटील, पोकॉ/योगेश पाटील, हरिष परदेशी, गणेश कुंवर, श्रीराम, शिंपी, नितीन भालेराव यांनी केली आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि कृष्णा घायाळ,हे करत आहेत.

(राहुलकुमार पवार)
पोलीस निरीक्षक, पाचोरा पोलीस स्टेशन
जि.जळगांव


मदत कक्ष
HELP DESK